नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १६ Issue - 16 | वार सोमवार दि. २ जून २०२५ Blow- Monday Date 2 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# जग स्तिमित होईल, असाच कुंभमेळा होणार : मुख्यमंत्री फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नाशिक येथे कुंभमेळा पूर्वतयारी आढावा बैठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : कुंभमेळा सुरक्षित, निर्मळ आणि पवित्र वातावरणात होण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी निधीची उपलब्धता करून देण्यात येईल. कुंभमेळा भारतीय सनातन संस्कृतीचे प्रतीक असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष याकडे आहे. त्यामुळे सर्वांच्या सहकार्याने जग स्तिमित होईल असे भव्य दिव्य आणि स्मरणीय आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यातील अमृत स्नानाचे दिवसही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सिंहस्थ कुंभमेळा पूर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

साधू-महंतांच्या उपास्थितीत कुंभमेळ्याच्या तारखांची घोषणा होणे ही खऱ्या अर्थाने कुंभपर्वाची सुरूवात आहे, असे नमूद करू मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, कुंभमेळ्याचे संचलन आखाडे, साधू -महंत करतात, राज्य शासन सेवक म्हणून अधिकाधिक चांगली सुविधा देण्याचा प्रयत्न करते. यावेळी देखील शासनातर्फे उत्तम सुविधा उभारण्यात येतील. कुंभमेळ्याबाबत साधू महंतांचा अनुभव मोठा आहे, त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल. २०१५ मध्ये तयारीसाठी कालावधी कमी होता. यावेळी पूर्व तयारीसाठी अधिक कालावधी असल्याने शासन चांगली तयारी करीत आहे.

गोदावरी निर्मळ राहावी आणि कायम प्रवाही राहावी हेच कुंभचे उद्दिष्ट असून तसा शासनाचा प्रयत्न आहे. गोदावरीचे पावित्र्य अबाधित राखण्यासाठी उपायोजना करण्यात येत आहेत. गोदावरीत जाणारे पाणी स्वच्छ असावे यादृष्टीने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी निविदा काढण्यात येत आहेत. नदी पात्रात अशुद्ध पाणी जाऊ नये असे प्रयत्न करण्यात येतील. नदी प्रवाहित राहिल्यास शुद्ध राहील, त्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे कुंभ आणि त्यानंतरही गोदावरीचे जल निर्मळ राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

साधू-महंतांच्या सूचना लक्षात घेवून शासन आवश्यक नियोजन करेल, असे नमूद करतांना श्री.फडणवीस पुढे म्हणाले, आखाड्यासाठी आवश्यक सुविधा उपालब्ध करून देण्यात येतील. साधूग्रामची जागा कायम स्वरूपी उपयोगात यावी यासाठी जमिन अधिग्रहित करण्यात येईल. कुंभमेळ्यासाठी शहरात

रस्त्याचे जाळे तयार करण्यात येत आहे. कुशावर्त येथे गर्दी होऊ नये यासाठी योग्य नियोजन करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे जन्मस्थान असलेल्या चौंडीच्या विकासासाठी ६८१ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यांनी तयार केलेल्या घाटांचे संवर्धन करण्यात येत आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथेदेखील उत्तम सुविधा उभारण्यात येतील. त्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. भाविक आणि साधू - महंतांची सुरक्षितता महत्वाची असल्याने नियोजन करतांना सुरक्षा विषयक उपाययोजनांना प्राधान्य देण्यात यावे, अशी सूचना त्यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविकात विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले, यावेळी सिंहस्थ कुंभमेळ्यात अधिक भाविक येण्याची शक्यता असल्याने गर्दी नियंत्रणाचे मोठे आव्हान असणार आहे. तीन अमृत स्नानसोबत इतर पर्वस्नान होणार आहेत. कुंभमेळ्याची कामे वेगाने सुरू असून ४ हजार कोटींपेक्षा अधिक कामाच्या निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. लवकरच २ हजार ६०० कोटींच्या निविदा काढण्यात येणार आहेत. ही सर्व कामे जानेवारी २०२७ पूर्वी पूर्णत्वास येतील. या कामांसाठी सर्व आखाड्यांचे चांगले सहकार्य मिळत आहे. सर्वांच्या सहकार्याने यंदाचा नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा चांगला आणि सुरक्षित होईल. इथे येणाऱ्या साधू-महंतांना सुखद आणि पावन अनुभव येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी विविध आखाड्याच्या साधू-महंतांनी कुंभमेळा आयोजनाबाबत सूचना केल्या. यावेळी श्री रामानंद निर्मोही आखाडा, निर्मोही अनी आखाडा, श्री दिगंबर अनी आखाडा, निर्वाणी अनी आखाडा श्री पंचायती उदासीन आखाडा, श्री पंचायती नया उदासीन आखाडा, श्री पंचायती निर्मल आखाडा, श्री पंचायती अटल आखाडा, श्री पंचायती महानिर्वाणी आखाडा, श्री पंच अग्नी आखाडा, यांच्यासह विविध आखाड्यांचे पदाधिकारी, नाशिक पुरोहित संघाचे अध्यक्ष सतीश शुक्ल, पुरोहित संघाचे त्र्यंबकेश्वर येथील अध्यक्ष मनोज थेटे आदी उपस्थित होते.

प्रारंभी सर्व साधू, महंतांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे मंत्रोच्चारात स्वागत केले. तसेच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सर्व साधू, महंतांचे शासनातर्फे स्वागत केले.

**नाशिक कुंभमेळा**

सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ- शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६, दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी (स्थळ- रामकुंड पंचवटी)

प्रथम अमृतस्नान-सोमवार २ ऑगस्ट २०२७,आषाढ सोमवती अमावस्या. महाकुंभस्नान/द्वितीय अमृतस्नान-मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या तृतीय अमृतस्नान-शनिवार ११ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध एकादशी

**त्र्यंबकेश्वर कुंभमेळा**

सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ- शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६,

प्रथम अमृतस्नान-सोमवार २ ऑगस्ट २०२७, आषाढ सोमवती अमावस्या.

महाकुंभस्नान/द्वितीय अमृतस्नान-मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या

तृतीय अमृतस्नान-शनिवार १२ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध द्वादशी (वामन द्वादशी).

याशिवाय नाशिक येथे सिंहस्थ पर्व पर्वकालातील सर्व एकादशी, पौर्णिमा, अमावस्या वैधृती व्यतिपात योग हे दिवस भाविकांसाठी तीर्थस्थान, दर्शन पर्व असतील. नाशिक येथे कुंभमेळा २०२७ मध्ये मुख्य तीन पर्वण्याव्यतिरिक्त पर्वस्नानाचे एकूण ४४ मुहूर्त असून त्र्यंबकेश्वर येथे पर्वस्नानाचे एकूण ५३ मुहूर्त आहेत. भाविकांनी अमृत स्नानाशिवाय पर्वस्नानाचा दिवशी देखील मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले आहे.

# स्वत:ची स्तुती करण्याची गरज नाही; ऑपरेशन सिंदूरवरून मल्लिकार्जुन खर्गे पंतप्रधान मोदींवर बरसले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'ऑपरेशन सिंदूर'बाबत देशातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर शाब्दिक वार केला आहे. 'ऑपरेशन सिंदूर' वर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणीचाही खर्गेंनी पुन्हा उल्लेख केला. राष्ट्रीय गोष्टींमध्ये एकता असली पाहिजे आणि विरोधकांना पराभूत करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे खर्गे म्हणाले. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवर सर्व नेत्यांनी मौन बाळगावे, असेही त्यांनी म्हटले. सीडीएस जनरल अनिल चौहान यांच्या वक्तव्यानंतर खर्गे यांनी हे वक्तव्य केले आहे. खरं तर, जनरल चौहान म्हणाले होते की, पाकिस्तानसोबतच्या अलीकडील युद्धात भारताचे नुकसान झाले आहे, परंतु त्यांनी पाकिस्तानचे ६ भारतीय विमाने पाडल्याचा दावा खोटा असल्याचे म्हटले होते. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान मोदींना घेरले. खर्गे म्हणाले की, राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यांवर बोलण्यापूर्वी सर्व नेत्यांनी काळजीपूर्वक विचार करावा. देशाची दिशाभूल केली जात आहे, म्हणून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले पाहिजे. 'आपल्याला काय आणि केव्हा बोलावे हे माहित असले पाहिजे. राष्ट्रीय बाबींमध्ये एकता असली पाहिजे आणि आपले लक्ष विरोधकांना पराभूत करण्यावर असले पाहिजे,' असा खोचक सल्लाही खर्गेनी मोदींना दिला. खर्गे पुढे म्हणाले, 'देशातील सर्व नेत्यांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवर मौन बाळगले पाहिजे. त्याबद्दल बोलण्यापूर्वी काय घडले आहे, ते समजून घेणे चांगले असेल.' 'ऑपरेशन सिंदूर'च्या राजकारणावरही खर्गे यांनी टिप्पणी केली. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी 'राजकीय भाषण देणे टाळावे.' शिष्टमंडळाचा अहवाल येईपर्यंत कोणताही निवडणूक प्रचार होऊ नये. तसेच पंतप्रधान मोदींनी स्वतःची प्रशंसा करण्याची गरज नाही, संपूर्ण देश आपल्या सशस्त्र दलांसोबत उभा आहे. ते पुढे म्हणाले, 'देशातील सर्व नेत्यांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवर मौन बाळगले पाहिजे. त्याबद्दल बोलण्यापूर्वी काय घडले आहे ते समजून घेणे चांगले.' 'ऑपरेशन सिंदूर'च्या राजकारणीकरणावरही खरगे यांनी टीका केली. ते म्हणाले की पंतप्रधान मोदींनी 'निवडणूक भाषणे देणे टाळावे.' शिष्टमंडळाचा अहवाल येईपर्यंत कोणताही निवडणूक प्रचार होऊ नये, असे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदींनी निवडणूक भाषणे देणे टाळावे, स्वतःची प्रशंसा करण्याची गरज नाही, संपूर्ण देश आपल्या सशस्त्र दलांसोबत उभा आहे. पंतप्रधान मोदी नमूद केले होते की, लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे, परंतु यावर खर्गे म्हणतात की, पंतप्रधान मोदींना याबद्दल वारंवार बोलण्याची गरज नाही. यामुळे असे दिसते की, सरकार या मुद्द्याचे राजकारण करत आहे. पाकिस्ताननेही त्यांच्या संसदेचे अधिवेशन बोलावले आहे, त्यामुळे भारतानेही या विषयावर चर्चा करण्यासाठी संसदेचे अधिवेशन बोलावले पाहिजे. यावरून भारत या मुद्द्याला किती गांभीर्याने घेत आहे, हे दिसून येते.



# शरद पवार, अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात बंद दाराआड चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकीत आपल्या पक्षाला सर्वाधिक यश मिळावं, यासाठी प्रत्येक पक्षाकडून रणनीती आखली जात आहे. विशेष म्हणजे या निवडणुकांआधी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे गट एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील काँग्रेस पक्ष सत्तेत आहे. तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्ष महाविकास आघाडीत आहे. विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पक्षाला चांगलं यश मिळालं. पण शरद पवारांच्या पक्षाला अपेक्षित यश मिळालं नाही. यानंतर आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी दोन्ही पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे या चर्चा सुरु असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे. तीन दिग्गज नेत्यांची एकत्र आणि बंद दाराआड बैठक झाल्याची माहिती समोर येत आहे.

पुण्यात साखर संकुलात आज महत्त्वाची बैठक पार पडली आहे. कृषी क्षेत्रात ख तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतकऱ्यांना काय फायदा होईल, याबाबत या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीला अजित पवार, शरद पवार यांच्यासह मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री जयंत पाटील यांच्यासह इतर नेतेदेखील उपस्थित होते. पण या बैठकीनंतर शरद पवार, अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात बंद दाराआड चर्चा झाल्याची माहिती आहे.

साखर संकुलाकील बैठकीनंतर शरद पवार, अजित पवार आणि जयंत पाटील वगळता सर्व नेते बैठकीतून बाहेर पडले. केवळ शरद पवार, अजित पवार आणि जयंत पाटील बैठकीच्या रुममध्ये बसून होते. या वेळी तीनही नेत्यांमध्ये बंद दाराआड बैठक पार पडली. या बैठकीत नेमकी काय चर्चा झाली? याबाबतची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. पण या बैठकीची टायमिंग महत्त्वाची आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. अशावेळी शरद पवार, अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात बंद दाराआड बैठक झाल्याची माहिती समोर आली आहे.

भूस्खलनाचीही आपत्ती

गेल्या दोन दिवसांत पावसामुळे गेलेल्या बळींची संख्या झाली ३०

# ईशान्य भारतात पर्जन्यसंकट; अरुणाचलमध्ये ९ तर आसाममध्ये ५ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ईशान्य भारतात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे आलेल्या पुरामुळे आणि भूस्खलनामुळे १४ जणांचा मृत्यू झाला आहे. यात अरुणाचल प्रदेशात अतिवृष्टीमुळे नऊ जणांचा जणांचा, तर आसाममध्ये पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती शनिवारी देण्यात आली. गेल्या दोन दिवसांत पावसामुळे गेलेल्या बळींची संख्या ३० झाली आहे.

अरुणाचल प्रदेशातील पूर्व कामेंग जिल्ह्यातील बाना-सेप्पा भागात राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भूस्खलनात वाहन वाहून गेल्याने शुक्रवारी दोन कुटुंबांतील सात जणांचा मृत्यू झाला. अतिवृष्टीमुळे झालेल्या भूस्खलनात त्यांचे वाहन खोल दरीत कोसळल्याचे पूर्व कामेंग पोलिस अधीक्षक कामदान सिकोम यांनी सांगितले. यात बळी गेलेले सर्व जण हे बाना येथील किटचांग जिल्ह्यातील रहिवासी होते, असेही ते म्हणाले.

या ठिकाणी बचावकार्य लगेच सुरू करण्यात आले. परंतु, मुसळधार पाऊस, सातत्याने होणारे भूस्खलन आणि रात्रभर अतिशय कमी असणारी दृश्यमानता यामुळे त्यात सतत व्यत्यय येत होता. अशा अडथळ्यांमध्येही पोलिस आणि बचाव पथकांकडून सातत्याचे त्यांचे प्रयत्न सुरू होते.

दरम्यान, गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या पावसात आसाममधील कामरूप (मेट्रो) जिल्ह्यात पाच जणांचा मृत्यू झाला. यात लहान मुलांचाही समावेश आहे, अशी माहिती आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (एएसडीएमए) दिली. एएसडीएमएने शनिवारी सकाळी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, पुरामुळे आसाममधील कामरूप, कामरूप (मेट्रो) आणि काचर हे तीन जिल्ह्यांतील सुमारे १० हजार १५० लोक बाधित झाले आहेत. गुवाहाटी शहरातही भूस्खलनाच्या तीन घटना घडल्याची माहिती देण्यात आली आहे. सातत्याने सुरू असणाऱ्या मुसळधार पावसामुळे गुवाहाटीतील रस्त्यांवर पाणी साचून राहू शकते. वाहतूक संथगतीने होऊ शकते. यामुळे दुर्घटनाच्या घटना घडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



मांगन : भारतीय हवामानशास्त्र विभागाने शनिवारी सिक्कीममधील तीन जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला आहे. येथील मांगन, घ्यालशिंग आणि सोरेंग जिल्ह्यांना हा इशारा देण्यात आला आहे. मुसळधार पाऊस आणि येथील तिस्ता नदीच्या पाण्याची वाढती पातळी लक्षात घेता पूर आणि भूस्खलनाचा धोका संभवू शकतो, असा इशारा देण्यात आला आहे.

श्रीनगर: संततधार पावसामुळे जम्मू-काश्मीरमधील जनजीवनावर शनिवारी विपरीत परिणाम झाला. बर्फवृष्टी आणि भूस्खलनामुळे येथील खिंडींमधील मार्ग बंद झाले. विजेच्या गडगडाटासह झालेल्या पावसामुळे प्रशासनाने राजौरी जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना सुट्टी दिली. येथील बांदिपुरा, कुपवाडा जिल्ह्यात रस्ते पावसामुळे बंद करण्यात आले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### ऑपरेशन सिंदूरवरून गदारोळ

'ऑपरेशन सिंदूर'बाबत देशातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर शाब्दिक वार केला आहे. 'ऑपरेशन सिंदूर' वर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणीचाही खर्गेनी पुन्हा उल्लेख केला. राष्ट्रीय गोष्टींमध्ये एकता असली पाहिजे आणि विरोधकांना पराभूत करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे खर्गे म्हणाले. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवर सर्व नेत्यांनी मौन बाळगावे, असेही त्यांनी म्हटले. सीडीएस जनरल अनिल चौहान यांच्या वक्तव्यानंतर खर्गे यांनी हे वक्तव्य केले आहे. खरं तर, जनरल चौहान म्हणाले होते की, पाकिस्तानसोबतच्या अलीकडील युद्धात भारताचे नुकसान झाले आहे, परंतु त्यांनी पाकिस्तानचे ६ भारतीय विमाने पाडल्याचा दावा खोटा असल्याचे म्हटले होते. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान मोदींना घेरले. खर्गे म्हणाले की, राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यांवर बोलण्यापूर्वी सर्व नेत्यांनी काळजीपूर्वक विचार करावा. देशाची दिशाभूल केली जात आहे, म्हणून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले पाहिजे. 'आपल्याला काय आणि केव्हा बोलावे हे माहित असले पाहिजे. राष्ट्रीय बाबींमध्ये एकता असली पाहिजे आणि आपले लक्ष विरोधकांना पराभूत करण्यावर असले पाहिजे,' असा खोचक सल्लाही खर्गेनी मोदींना दिला. खर्गे पुढे म्हणाले, 'देशातील सर्व नेत्यांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवर मौन बाळगले पाहिजे. त्याबद्दल बोलण्यापूर्वी काय घडले आहे, ते समजून घेणे चांगले असेल.' 'ऑपरेशन सिंदूर'च्या राजकारणावरही खर्गे यांनी टिप्पणी केली. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी 'राजकीय भाषण देणे टाळावे.' शिष्टमंडळाचा अहवाल येईपर्यंत कोणताही निवडणूक प्रचार होऊ नये. तसेच पंतप्रधान मोदींनी स्वतःची प्रशंसा करण्याची गरज नाही, संपूर्ण देश आपल्या सशस्त्र दलांसोबत उभा आहे. 'देशातील सर्व नेत्यांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवर मौन बाळगले पाहिजे. त्याबद्दल बोलण्यापूर्वी काय घडले आहे ते समजून घेणे चांगले.'

# पुस्तकाचे नाव -बोळातले भूत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लेखक – उत्तम सदाकाळ
प्रकाशक – दिलीपराज प्रकाशन, पुणे.
प्रकाशन वर्ष – १ मे २०२५
पृष्ठे – ६०
वाङ्मय प्रकार– कवितासंग्रह
मूल्य – २२० रु.
मुखपृष्ठ– – संतोष घोंगडे
समीक्षक – सचिन बेंडभर.

–

ज्ञान, मनोरंजन आणि संस्कारांचा खजिना : बोळातले भूत

लेखक उत्तम सदाकाळ आजच्या पिढीचे आघाडीचे लेखक आहेत. आजपर्यंत त्यांची ८५ पुस्तके प्रकाशित आहेत. साहित्य क्षेत्रात त्यांचे विविधांगी लेखन असून बालसाहित्यात त्यांचा चांगला हातखंडा आहे. पाऊस व जंगलगाणी या पुस्तकांच्या भरघोस यशानंतर बोळातले भूत या बाल कथासंग्रहाच्या निमित्ताने ते पुन्हा बालवाचकांच्या समोर आले आहे. या काव्यसंग्रहातील कथा या मनोरंजनाबरोबरच ज्ञान आणि संस्कार देण्याचे काम करतात. असा त्रिवेणी संगम असलेला हा कथा संग्रह बाल वाचकांसाठी एक मेजवानीच असेल. या कथा संग्रहात एकूण ९ कथा असून सर्वच कथा वाचनीय असून मुलांच्या वयोगटाला साजेशा आहेत.


उत्तम सदाकाळ हे जवळजवळ गेली दोन दशक साहित्य प्रांतातील एक परिचित नाव. त्यातल्या त्यात बालसाहित्यात त्यांची एक आगळीवेगळी ओळख आहे. मुळातच शिक्षक म्हणून कार्यरत असल्यामुळे त्यांना मुलांच्या भाव विश्वाची कल्पना आहे. सोशल मीडियाच्या जमान्यात वाचनापासून दूर चाललेल्या पिढीला वाचनाकडे वळवण्याचे प्रभावी तंत्र सदाकाळ यांच्याकडे आहे. साधी सोपी भाषा शैली, समर्पक शब्द आणि बालमनाचा घेतलेला ठाव यामुळे त्यांचे लेखन वाचकांच्या हृदयाला नकळत स्पर्श करून जाते.

आईची माया या पहिल्याच कथेत लेखकाने आपल्या लेखणीची चुणूक दाखवली आहे. ही कथा म्हणजे त्यांचा स्व अनुभव असल्याने तो अधिक प्रभावीपणे मांडला गेला आहे. या कथेत चंपी नावाच्या एका कुत्रीचे वर्णन आहे. जी आपल्या पिलांसाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता वाघाशी झुंज देते. व आपल्या लहानग्या पिलांसाठी स्वतःचा जीवही देते. माणूस असो की प्राणी त्यात भावना या ओतप्रत भरलेल्या असतात. आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी ते नेहमी झटत असतात. मग मुके प्राणीही त्याला अपवाद नाहीत. शेवटी भावनिक करणारी ही कथा आईची माया काय असते ते सांगून जाते.

चक्रीवादळ या कथेत किशोर, रमेश आणि संजय जांभळाच्या झाडावर जांभळे खात होते. अचानक त्यांना आवाज आला तर शाळेच्या इमारतीवर वानरांचे टोळके उड्या मारत होते. त्यांनी उड्या मारून शाळेची भरपूर कौले फोडली होती. त्या तिघांना बघून वानर पळून गेले, परंतु शाळेचे भरपूर नुकसान झाले होते. तसेच चक्रीवादळ येण्याची बातमी त्यांच्या कानावर आली होती. जर वादळ आले तर शाळेचे छप्पर उडून जाईल हा धोका ओळखून त्यांनी मोठ्या माणसांची मदत मागितली. परंतु ती कामात असल्यामुळे कुणाचीही मदत मिळाली नाही. मग शेवटी त्यांनी स्वतःच शाळेची कौले बसवली. ते काम करत असताना सरपंचांनी त्यांना पाहिले मग त्यांनीही त्यांना मदत केली. चौघांच्या मदतीने शाळा दुरुस्त झाली. त्यानंतर चक्रीवादळ आले. परंतु शाळेची दुरुस्ती केल्यामुळे शाळा वाचली. अशा प्रकारे सामाजिक बांधिलकीची जपणूक करणारी ही कथा मुलांना खूप काही शिकवून जाते.

बोळातले भूत ही शीर्षक कथा किशोर नावाच्या एका छोट्या मुलाची आहे. मित्राकडून अभ्यास करून येताना किशोरला एकदा उशीर झाला. बोळातून जाताना त्याला खसफसल्याचा आवाज आणि कुणीतरी असल्याची जाणीव झाली. मात्र या गोष्टीचा शेवट अतिशय सुखद धक्कादायक पद्धतीने केला आहे. तो पाहायचा असेल तर आपल्याला ही कथा वाचावी लागेल. लेखकाने अंधश्रद्धेचे समर्थन न करता मुलांना धाडसी बनण्याचा सल्ला दिला आहे.

या कथासंग्रहातील सर्वस कथा वाचनीय असून मुलांच्या भावविश्वाशी निगडित आहेत. ओघवती भाषाशैली, प्रसंगाचे केलेले हुबेहूब वर्णन आणि जिवंत उभ्या केलेल्या व्यक्तिरेखा यामुळे या कथा वेगळ्या उंचीवर जातात. मुलांनी आपल्या ज्ञानात भर पडण्यासाठी, मनोरंजनासाठी आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव होण्यासाठी हा कथासंग्रह वाचणे गरजेचे आहे. प्रत्येकाने आपल्या ग्रंथालयात जपून ठेवावे असे सुंदर पुस्तक म्हणजे बोळातले भूत.




पुणे येथील नावाजलेल्या दिलीपराज प्रकाशनने या पुस्तकाची साजेशी बांधणी केली आहे. पुस्तकाची गुणवत्ता आणि पानांचा दर्जा त्यांनी केलेल्या मेहनतीची साक्ष देतो. नांदेड येथील प्रसिद्ध बालसाहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी या पुस्तकाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली आहे. पुस्तकाची पाठराखण किशोरचे संपादक किरण केंद्रे यांनी केली आहे. या पुस्तकाला प्रसिद्ध चित्रकार माननीय श्री. संतोष घोंगडे, यांनी विषयाला अनुरूप काढलेल्या आकर्षक मुखपृष्ठाने व प्रसंगाला अनुरूप दिलेल्या आतील चित्राने पुस्तकाच्या उंचीत मोलाची भर घातली आहे. बालसाहित्यिक उत्तम सदाकाळ यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा..!

**– सचिन बेंडभर पाटील**
**कार्यकारणी सदस्य,**
**अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे.**

# एक परामर्श ..; खुला समाज निर्माणातील प्रश्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंडियन कम्युनिटी फोर कल्चरल फ्रीडम न्यूज बुलेटीन जुलै १९६५

व्यक्ती आणि समाज जीवनाच्या वर्तनात उद्याच आदर्श जीवन निर्माण स्वप्न तो आशावाद आणि आजच कटू वास्तव जीवन हा नित्य विचाराचा व्यवहार चालू असतो. आदर्श छोटे मोठे जीवन निर्माणची आशा आणि वास्तव हे दोन्हीही सतत व्यक्तीं व समाज नित्य जीवनाच्या चिंतनाचे विषय असायला हवेत. आजचा समाज त्याचे विषमताग्रस्त वास्तव हे बदलायचे असेल, तर उद्याच्या समाजासाठी स्वप्न वाद ,आशावाद बाळगून प्रयत्न करण् नितांत गरज असते. त्यासाठी काही कल्पना आणि धोरणे यांचे रचना ही परिवर्तनासाठी करावी लागते. या सातत्यपूर्ण वर्तनातून समाज हा खुला समाज तयार होऊ शकतो, पण खुल्या समाजाच्या रचनेसाठी आजची अवस्था समजावून घेणे. हे नितांत महत्त्वाचे असते. आधुनिक समाज हा खुला समाज असेलच असा भ्रम बाळगणे हा स्वतःचा अपयशाचा मार्ग ठरतो आधुनिकता आणि खुलेपणा या एकत्रित असायलाच हव्यात परंतु जीवनाची भौतिक आधुनिक सोयी सुविधांची आकांक्षा आणि प्राप्ती बाळगणारा समाज स्वतःला आधुनिक समजतो मात्र विचाराचे खुले पण आपल्या वर्तनात तो बाळगत नाही खुलेपणात पारदर्शकता असावे लागते जावदायित्व असावे लागते खुलेपणात असहमतीला स्वीकारले जाते खुलेपणामध्ये विचाराची सक्ती आणि एकतंत्री एकाधिकारशाही असत नाही खुला समाज हा नवनीत नव्या कल्पना आणि वास्तवाचे वर्तमान बदलण्याचा आग्रह धरतो अशा खुल्या समाजाचे समताधिष्ठित वर्तन निर्माण करायचे असेल मानवता अधिष्ठित जीवनाचा किमान पाया रचण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नांचे आणि योगदान देण्याचे प्रयत्न अपेक्षित असतात खुला समाज हा विचाराशिवाय निर्माण होणे असंभव आहे वर्तमानाच्या गुणदोषांची चिकित्सा केल्याशिवाय खुला समाज निर्माण शक्य नाही.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये काँग्रेसने एशियन ऑफिसच्या वतीने बुद्धिमत्ता चा आयोग हा स्थापन केला होता आज नीती आयोग आहे इंडियन नॉलेज सिस्टीम आहे पण बुद्धिमत्ता चा आयोग हा १९६५ मध्ये भारतात कार्यरत होता त्याच्या कार्याची उद्दिष्टांची आणि चर्चांची ही विश्लेषणाची कथा पुढीलप्रमाणे

डॅनियल बेल यांनी कल्चरल फ्रीडम यासाठी एक तयार केलेला प्रोग्राम खूप महत्त्वाचा आहे त्याच्या पहिल्या बैठकीत अशोक मेहता अध्यक्षस्थानी होते आणि त्यामध्ये काढण्यात आलेले निष्कर्ष खूप आज सम काळामध्ये उपयोगी पडतात स्वतःचे प्रश्न त्यांची चिकित्सा करणे आणि त्यातून गुणदोषाच्या निर्मूलनासाठी कार्यक्रम आखणे या बुद्धिमत्ता च्या आयोगाच्या पहिल्या बैठकीत चर्चा झाली होती बुद्धिमत्ता आयोगाच्या उपसमितीमध्ये डॉक्टर रजनी कोठारी प्रभाकर पाध्ये एबी शहा यांचा समावेश होता आणि त्यांनीच बुद्धिमत्ता च्या या आयोग चेवतीने कल्चर फ्रीडम अर्थातच स्वातंत्र्याची संस्कृती याचा मसुदा तयार केला होता हा आज खूप महत्त्वाचा वाटतो म्हणून तो सादर करण्याचे प्रयत्न इथे केले आहेत या आयोगाच्या अनेक बैठका झाल्या त्यामध्ये स्वातंत्र्याची संस्कृती यावर प्रकट करण्यात आलेली मते ही २०२५ मध्ये समजून घेताना समकालाच्या समस्यांना त्याची मदत होईल हीच भावना आहे

आधुनिक समाज याची निर्मिती परंपरेच्या विमोचनाशिवाय त्यापासून सुटका केल्याशिवाय आधुनिक समाज निर्माण होणे असंभव आहे आजच्या समाजातील वास्तवता त्याच्यातील आव्हाने गतिरोध समाजाच्या तीव्र गरजा आणि परंपराचे समाज वर्तनावर होणारे विघातक परिणाम याचा विचार सामूहिकपणे करण्याची गरज असून त्यासाठी एक सार्वत्रिक सहमतीचे बदलाचे मन समाजाचे तयार करणे हे आधुनिक समाज निर्माण असे प्राथमिक कर्तव्य आहे.आधुनिक समाजाची निर्मिती हे राष्ट्र निर्माणच्या सोबतच होणे अभिप्रेत आहे स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रनिर्माणाचा प्रयत्न आणि आधुनिक समाज निर्मिती ही उद्दिष्टे एकत्रित होते आज व्यक्तिवादी व अल्पसंख्यांक जातीयवादी समाज हे स्वतःला आधुनिक समाज तयार करण्याच्या व लग्न करतात मात्र राष्ट्र निर्माणच्या व्यापक प्रयत्नापासून दूर राहतात आधुनिक समाज निर्मितीसाठी ची तंत्रज्ञानाची प्राप्ती आणि उपयोजन करत राहतो व संस्थात्मक निर्माण ही हा समाज काही प्रमाणात करतो मात्र आपली राष्ट्र निर्माणच्या कार्यातील जबाबदारी दुर्लक्षित करून त्याचे वर्तन केवळ नफा लाभ शोषण अशा स्वरूपाचे जर ठेवले तर तंत्रज्ञान आणि औद्योगीकरण रोजगार निर्मितीच्या संधी जरी असल्या तरी त्या राष्ट्र निर्माणच्या योगदानात उपयुक्त ठरतात असे आज दिसून येत नाही

समाज मनातील अंतर संबंध मनो संबंध धार्मिक परंपराचे आग्रह याचे परिणाम प्रत्येक समाज गटावरून ज्या मनावर होत असतात आणि त्यातून हा समाज दोन्ही प्रकारचे वर्तन करीत भौतिक व्यवस्थांचा आग्रह चंगळवादाचा अतिरेक आणि दुसऱ्या बाजूला धर्म रुढी परंपरांच्या जतनाची धन्यता समाज बाळगत असतो आणि आपल्या अस्मिता भिन्नता वैविध्य याचे महात्म्य स्वतःच कथन करतो ही वास्तवता समाजाच्या भिन्नभिन्न वर्तनाच्या संघर्षाचे कारणे तीव्र टोकदार बनतात आणि त्यातूनच आधुनिकता ही एक विचाराची खुलेपणाची सत्यव्रतनाची नागरी जीवनाच्या सर्व नैतिक वर्तनाच्या अंमलबजावणीची जीवन सरणी असते हे विसरून रुढी आणि परंपरांचा आग्रह आणि त्यातील धन्यता ही भारतीय समाजाला खुला समाज निर्माण पासून रोखते आहे हेही भारतीय समाजाला कळत नाही.

स्वातंत्र्य उत्तर काळात १९६५ पासून राष्ट्र निर्माणच्या दीर्घ प्रयत्नात निरंतर प्रयत्नात समाज बदलाची गती मंद असते हे खरेच पण बदलाच्या प्रक्रियेत मानसिकता भौतिक संघर्ष आंतरिक बंधू भावात होणारा बदल आणि समाज व्यवहारातील संघर्ष हे सगळे आधुनिक समाज निर्मलाच्या प्रवासात समाजात अंतर्गत हे वर्तन भाव आढळून येतात अशा प्रकारचे वर्तन चालू असते ही संक्रमण शील अवस्था असते हा बदलाचा एकमेकांवर होणारा परिणाम असतो आणि म्हणून गतिशील समाज व स्थितिशील रूढी परंपरा आणि श्रद्धा यांचा एकमेकावर होणारा परिणाम हा खुला समाज निर्माण करत असताना समजावून घेण्याची नितांत गरज आहे रूढीभक्त व श्रद्धायुक्त समाज हा स्थितीशील राहतो त्यात धन्यता मानतो ती अवस्था बदलायला तो तयार होत नाही आणि त्यामुळे आधुनिक ची आकांक्षा भौतिक वादाचा स्वीकार आणि दुसऱ्या बाजूला विसंगत असा रूढीबद्ध वर्तन आग्रह हा विसंगत वर्तन व्हाव समाज वर्तनात आढळून येतो यामुळेच खुला समाज आधुनिक समाज आणि राष्ट्र निर्माण चे कार्य पुढे जात नाही राष्ट्रनिर्माणाची प्रक्रिया भौतिकता वाढवून समृद्धी वाढवून दारिद्र्य नाहीसे करून आधुनिक राष्ट्र निर्माण होत नाही अजून एक समाज आणि राष्ट्र निर्माण या एकमेकाला वरिष्ठ करणाऱ्या निरंतर चालू राहणाऱ्या व अपूर्ण असणाऱ्या या प्रक्रिया समाज वर्तनाच्या असतात याच्या अंतरंगात संस्कृतीचा धर्माचा शोषण परंपरांचा हितसंबंधांचा संघर्ष निरंतर चालू असतो यात धोरणे कल्पना कपटनीती फसवणूक धर्मग्रंथाचा आधार अस्मितांचा कल्लोळ हा तयार केला जातो आणि त्यातूनच आज खुला समाज निर्माणच्या कार्यात अडसर निर्माण होतात हे आजचे वास्तव आहे फ्रीडम ऑफ कल्चर अर्थातचस्वातंत्र्याची संस्कृती हे बुलेटीन चालवणाऱ्या न्यूज जुलै १९६५ च्या अंकामध्ये पान नंबर आठ वर भारतीय संस्कृती समाज आणि स्वातंत्र्य याच्या विविध शहरातील उपक्रमांचा आढावा घेतला आहे मुंबई स्थित झालेल्या सेमिनार प्रदर्शने आणि दिल्ली कलकत्ता या शहरातील सांस्कृतिक मंथन या अंकामध्ये मांडले आहे एकूणच संस्कृतीचा ज्ञानासाठी स्वातंत्र्यासाठी कसा बौद्धिक पातळीवर प्रयत्न करता येईल वापर करता येईल असे हे स्वातंत्र्याची संस्कृती या आयोगाचे हे काम खूप स्तुत्य आणि आदर्श वाटते.

कोणताही समाज आणि राष्ट्र निर्माणच्या व्यापक कार्यात आधारभूत धरलेली संहिता म्हणजे संविधान याचा व्यापक परिणाम सतत होत राहतं किंबहुना त्यातूनच विशिष्ट असा आदर्श समाज साकारण्याची शक्यता संभवते भारतीय संविधानाच्या या प्रवासाच्या दीड दशकात संस्कृती आणि स्वातंत्र्याचा मूलगामी विचार करणारा आयोग हा किती गंभीर वर्तन करीत होता हे यावरून प्रतीत होत आहे वास्तवता आणि नेतृत्व आणि त्या देशातील सर्व क्षेत्रातील प्रशासकीय कामकाज यामध्ये देशाच्या विकासाचा निर्माणचा अंदाज बांधता येतो १९६५ मध्ये संस्कृत आणि स्वातंत्र्याच्या आयोगाने जो विचार केलेला आहे तो तत्कालीन ब्राह्मण वर्ग हा आधुनिक त्याचा भोक्ता आहे परंतु आधुनिकता आणि ब्राह्मण हा द्वैतभाव राहता कामा नये तर आधुनिकता सर्व समाज गटात स्वीकारली गेली पाहिजे उद्याचा स्वप्नवाद आणि वास्तव या संभ्रमात प्रत्येक समाज गट असतो आजचे वास्तव उद्याचा स्वप्न आशावाद पाहिल्याशिवाय बदलत नाही यासाठी आधुनिकतेचा स्वीकार करण्याची आंतरिका सक्ती असली पाहिजे हे १९६५ मध्ये आढळून आलेलं निरीक्षण स्वातंत्र्याच्या संस्कृती आयोगाने नोंदवलेले होते उद्याचा आशावाद स्वप्न वाद हा काही धोरणात्मक कार्यक्रमातून आणि त्यांच्या मूल्यमापनातून साकारू शकतो यासाठी सर्व पातळीवर विचार करणे कृतिशील कार्यक्रम आखणे समन्वय आणि सहभाग समाजाचा व्यापक पातळीवरती घेणे शासनाच्या वरून खाली असलेल्या रचनेमध्ये सुसंवाद आणि एकत्रित वर्तन व्हावं निर्माण करणे हे झाले तरच हा दबाव गट निर्माण झाला तरच आधुनिक ता आणि खुला समाज या दिशेने समाज वर्तनामध्ये थोडी वाढ होऊ शकते हे स्वातंत्र्याची संस्कृती आयोगाचे मत त्यांनी पान क्रमांक १३ वर नमूद केले आहे

स्वातंत्र्य उत्तर काळातील नेहरू युगाचा कालखंड हा देशाच्या बौद्धिक नेतृत्वाचा विकसनशील कालखंड होता असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही.

विचारवंत आणि सामाजिक परिवर्तन यांचा अनुबंध त्यांच्या कृती आणि कथनामध्ये होता त्यासाठी प्रश्नांची प्राधान्य क्रमाने निवड करणे ही विचारवंत गटांना गरज वाटत होती आणि त्यातून जो स्वप्नवात जरी वाटला आदर्शवाद जरी वाटला तरीही प्रत्यक्षात विरोधाची भूमिका घ्यावी लागली तरीही सामाजिक प्रश्नांच्यासाठी आग्रही राहणे हे विचारवंतांचे वर्तन त्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येत होते वैचारिकता विश्लेषण करीता आणि कृतिशीलता ही नेहरू काळामध्ये स्वातंत्र्याच्या संस्कृती आयोगाच्या अनेक सदस्यांच्या वर्तनामध्ये होती आणि त्यामुळेच ते विरोधाच्या भूमिकेत जरी असले त्यांचा तात्विक विरोध असला तरीही खुला समाज आधुनिक राष्ट्र निर्माण आचा ग्रह हा कोणी आमान्य करीत नव्हते.

भारतीय समाजामध्ये सहमती एकत्रित विचार ही प्रक्रिया विकसित करणे ही अवघड गोष्ट सर्व कालखंडात राहिली आहे समाजसहमती आणि मतैक्य असल्याशिवाय उद्याचा भारत आजचा बदल आपणाला करता येणार नाही या प्रकारची विचार सहमतीच्या महात्म्याची मनोवृत्ती भारतीय नागरिकांच्या मध्ये वाढवण्याचे नि तांत गरज आहे हे प्रबोधन झाले पाहिजे कोणत्याही देशातील नव्या पिढ्यांच्या वर्तनात आणि वैयक्तिक मतांच्या मध्ये एक वाक्यता असू शकत नाही मत भिन्नता हे नव्या पिढीचे वैशिष्ट्य असते हे विधायक आहे किंवा नाही ते विघात कितपत आहे याचे परिणाम मतविन्नतेचे काय होतात हे त्यांच्या समजून घेण्याच्या वयाचे परिणाम असतात आणि त्यामुळे आधुनिक समाज आणि मत भिन्नता मताईक्य आणि वास्तव बदल या मनस्थितीचा विचार बदलांचा खूप वैचारिक क्षेत्रात विचार करण्याची गरज असते प्रतिक्रिया अभिप्राय असहमती कायम अशीच ठेवून वास्तव बदलता येत नाही आणि खुला समाज निर्माण असे स्वप्न आपणाला साध्य करता येत नाही हे आजही समजावून घेणे खूप महत्त्वाचे ठरते

जग ही एक बदलाची अवस्था आहे जगाची व्याख्याच भिन्नता आणि सतत बदल आणि नवा विचार नवागतिरोध म्हणजे जग अशी आज आधुनिक विचार विश्वात जगाची व्याख्या केली जाते जगाच्या एकूण दबावाचे एकमेकांच्या राष्ट्रीय व्यवहारावर होणारे परिणाम आणि तेथील बदलते समाज जीवन त्यांच्या धरणांच्या बदलत्या भूमिका हा सुद्धा एक ज्ञान विश्वाचा माहिती विश्वाचा विस्फोटकारी परिणाम आता आढळून येतो जग हे ध्रुवीकरणांमध्ये वर्तन करून पाहते हे ध्रुवीकरण धार्मिक भांडवलदारी साम्राज्यवादी कामगार व शेतकरी यांच्या विचाराच्या राज्यव्यवस्थांच्या स्वीकाराचे तर तंत्रज्ञानाच्या साम्राज्यवादी शक्तीचे असे अनेक ध्रुवामध्ये जगाचे ध्रुवीकरण चालू आहे.

स्वातंत्र्याची संस्कृती या आयोगाने भारताचा ध्रुवीकरणाचा प्रवास एशियन कंट्री आणि आफ्रिका या दोन पातळ्यांवर गृहीत धरलेला होता आज मात्र भारत व्हाईट रेसिजम च्या व डिजिटल कॅपिटलिसमच्या दोन ध्रुवांच्या मध्ये पुन्हा विघटित होऊ पाहतो आहे कठरपंथीय वंशवादी आणि धर्मप्रसारवादी हा सुद्धा सर्व काळातला ध्रुवीकरणाचा एक गट कित्येक शतकांच्या मध्ये जगभर जगाला आपल्याकडे खेचतो आहे अशा अवस्थेत खुला समाज आधुनिक समाज आणि आधुनिक राष्ट्र निर्मिती यांच्या अपूर्ण टप्प्यावरील प्रक्रिया या सातत्याने राहात येणार आहेत पण तरीही पूर्णत्वाचे आदर्श रूप कोणतेही अंतिम असत नाही त्या व्यवस्थांच्या निर्माण अंतर्गत होणारे दोष हे त्या व्यवस्थेला खेळखुळे करतात आणि व्यवस्थेचा अंतर्गत द्वंद्व भाव हा समजावून घेणे महत्वाचे ठरते.

यावरील सर्व स्वप्नवादी आशावादी चर्चा मध्ये कटू राजकारण्याचे आघोरीवर्तन हा सर्व देशांच्या पुढील मोठा घन प्रश्न आहे राज्यातील राज्यव्यवस्था त्यांच्या पुढील बहुसंस्कृतिक समाज रचनेचे वास्तव आणि त्याच्यावरील नियंत्रणासाठी बहुसंख्यांक आणि एकाधिकारशाहीचा त्यांनी स्वीकारलेला मार्ग हा त्या त्या राष्ट्रातील उद्रेकाची कारणे आता ठरू लागला आहे हे जगातल्या सर्व राष्ट्रांच्यात कमी अधिक स्वरूपात आढळून येत आहे म्हणून बहुसंस्कृतिकता बहुविविधता ही नाकारण्याची मानसिकता म्हणजे अनेक संकटांचे आणि रक्त संघर्षाचे निमंत्रण त्या त्या राष्ट्रांनी स्वतःला प्राप्त करून घेणे अशी आजची अवस्था आहे युद्ध नको बुद्ध हवा ही भाषा त्यातूनच येते युद्धाच्या सिंदूर हा घरोघरी पोहोचवण्याचे खोटे राजकारण त्यातूनच सुरू होते युद्ध हा एक शत्रू दाखवण्याचा आणि त्या देशातील नागरिकांच्या अस्वस्थ मानसिकतेचा गैरफायदा घेण्याचा शरणता त्यांच्या वर्तनात निर्माण करण्याचा युद्धनीतीचा प्रयत्न असतो अस्थिरता ही निर्माण केली की ती राज्यसत्ता बलिष्ठ.

एकूणच एकूणच भारतीय स्वातंत्र्याच्या संस्कृती समितीने १९६५ साली केलेला विचार हा आजच्या समकालाला किती उपयुक्त आहे हे प्रतीत झाल्या वाचून राहत नाही यामध्ये सहभागी असलेल्या विद्वत जणांच्या जैविक विचारवंत वर्तनाचा अनुभव हे सगळे वाचताना येत राहतो आपल्या समाजाचे वर्तन आणि त्याचा आविष्कार हा सतत तपासला असता नियोजन भ्रष्टाचार आणि वास्तव त्यातून होणारा विकासाचा भ्रम आणि लादलेले जाचक नियम या विचारात व्यस्त राहिलेला समाज खुल्या समाजाचे व्यापक स्वप्न स्वतःच विसरतो आणि या भिन्न ग्रासलेल्या प्रश्नांच्या वास्तवामध्ये संघर्ष अपयशाचा यशाचा करीत तो गुंतून राहतो आहेच समाजाच्या आजच्या वास्तवाचे खरे स्वरूप आहे भारतीय आजचे समाज वास्तव धर्मउनमादता वंश वंश उन्मादात. सतत वाढते आहे आणि बनिया कॅपिटल रिझल्ट आणि फेक वॉर इम्प्रॅलिझम हा वाढतो आहे. अशा वेळेला खुला समाज आधुनिक समाज संविधानातील संहिता आणि त्यातील मूल्याधिष्ठित आदर्श समाजाचा स्वप्नवाद कसा साकारणार हे सारखे प्रश्न उपस्थित होतात पण याही प्रश्नाचा कालच्या पिढीने खूप विचार केला होता आणि म्हणूनच केंद्रभूत समाजाचे सहमतीचे वर्तन राष्ट्रनिर्माणाचे वर्तन भिन्न संस्कृतीचा आदर करणारे वर्तन सह अस्तित्व वादातला महत्त्व देण्याचे वर्तन आणि तंत्रज्ञानाचा मानव्य प्रस्थापित करण्यासाठी चा वापर. हे मध्यवर्ती विचार सूत्र समाजातील सर्व वर्गात गटात युवकांच्या मनात रुजवल्याशिवाय स्वातंत्र्याची संस्कृती हे भारतीय कल्चरल फ्रीडम चे स्वप्न त्या विचारवंताचे साकारणे साठी हे समजून घेणे नितांत महत्त्वाचे आहे

टिप संदर्भ इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम न्यूज बुलेटीन जुलै१९ ६५

**– शिवाजी राऊत ,**
**सातारा**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

थोडक्यात...




## शिवीगाळ करत शारीरिक व मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पतीसह सहा जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून फिर्यादी सिमरन अक्रम कोठाळकर (वय-२०,रा. सध्या रेवणसिद्धेश्वर नगर,होटगी रोड) यांना शिवीगाळ करून मारहाण करत शारीरिक व मानसिक तसेच आर्थिक त्रास दिल्याची फिर्याद एमआयडीसी पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती अक्रम,सासू हमीनाबाई,दिर बंदेनवाज,मोठी नणंद मदिना,शबाना व पतीची भाची अकलीन मंटुर (सर्व.रा.रहीम नगर,विजयपूर, कर्नाटक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना १५ एप्रिल २०२३ ते ८ मे २०२५ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मुजावर हे करीत आहेत.

## होटगी रोडवरील टाटा क्रोमाचे शोरूम फोडून ४० लाखांचे मोबाईल लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) सोलापूर येथील होटगी रस्त्यावरील टाटा क्रोमा स्टोअर ए४५८ या स्टोअरच्या काचेचे फसाड फोडून अज्ञात चोरट्याने आज प्रवेश करून ४० लाख ४१ हजार २२० रुपये किमतीचे महागडे मोबाईल व बॅग चोरून नेल्याची घटना २९ ते ३० मे च्या दरम्यान टाटा क्रोमा स्टोअर होटगी रोड येथे घडली.याप्रकरणी जितेंद्र दिलीप वाणी (रा. रोहिणी नगर भाग ३, ओम गर्जना चौक) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

## मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी ; एकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना २६ मे रोजी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास केगाव हत्तूर बायपास येथे घडली.याप्रकरणी इंद्रजीत बंडा भोसले (वय-५२,रा.कवठे,ता. उत्तर सोलापूर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,केगाव हत्तूर बायपास रोडवर कवठे ब्रिज येथे कंटेनर क्रमांक डीडी.०१ एन.९५७४ यातील अज्ञात चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हत्तुरच्या दिशेने भरधाव वेगाने चालवून गावातील मुलगा नैतिक राम माने (वय-१७,रा.कवठे) हा चालत रस्ता क्रॉस करताना त्याला धडक देऊन गंभीर जखमी करत मृत्यू कारणीभूत ठरला आहे. तसेच अपघाताची माहिती न देऊन गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल वाल्मिकी हे करीत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी लोकसेवेसाठी आपले जीवन व्यतीत केले : डॉ. यशपाल खेडकर

## स्वेरीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी भारताच्या संस्कृतीचा वारसा असणारी अनेक मंदिरे व नदीघाट यांचा जीर्णोद्धार केला. त्यामुळे भारतीय धर्म संस्कृतीचे जतन होण्यास मोलाची मदत झाली तसेच अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी त्यांनी धर्मशाळांचे बांधकाम केले. तत्कालीन भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी व महिलांच्या न्याय हक्कांसाठी त्यांनी अनेक समाजोपयोगी धाडसी निर्णय घेतले. रयतेचे राज्य व्हावे यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी पाहिलेले स्वप्न त्यांनी सत्त्यात उतरवले. एकूणच एका साम्राज्याची महाराणी म्हणून कार्य करताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी लोकसेवेसाठी आपले जीवन व्यतीत केले.' असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या प्रथम वर्षाचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील स्वेरीमध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३००वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. खेडकर हे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकत होते. प्रारंभी स्वेरीचे युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे यांच्या हस्ते व नुकतेच महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागात निवड झालेले स्वेरीचे माजी विद्यार्थी मिनाक्षी रोंगे, शुभम शिंदे व तेजश्री लेंडवे यांच्या उपस्थितीत पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. खेडकर पुढे म्हणाले की, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कर्तुत्वाचा हुंकार आज ३०० वर्षानंतरही ऐकू येतो. यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून आपल्या सोलापूर विद्यापीठाला देखील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिले आहे.' असे सांगून त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विशाल कार्यातील महत्वाचे बाबी सांगितल्या. संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने बी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. जे मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही. मांडवे, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. एन.व्ही.कौटकर, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस.बी. भोसले, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. सुमंत आनंद, सिव्हील इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख प्रा. एस.पी.पाटील, एम.बी.ए. विभागाचे प्रमुख डॉ. के.पी. गलानी, रजिस्ट्रार आर.जी. झरकर, प्रा. पूजा रोंगे, प्रा. एस. एम.खोमणे, प्रा. यु.एल. अनुसे, इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी प्रवेशासाठी आलेले पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते तुकाराम विठू पवार कालवश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



गुहागर /प्रतिनिधी : आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते, बी.ई. एस.टी मधील निवृत्त आदर्श, कर्मचारी, बौद्धजन सहकारी संघ, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी, विभाग क्र. ६, शाखा क्र. ५१, मौजे खोडदे या शाखेचे प्रमुख सल्लागार माननीय तुकाराम विठू पवार यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने नुकतेच नालासोपारा येथे महानगरपालिका रुग्णालयात दुःखद निधन झाले.

कालकथित तुकाराम विठू पवार हे सोज्वळ मनाचे, हसतमुख, सर्वसमावेशक, मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावाचे होते व स्पष्टवक्ता, आदर्श व्यक्तिमत्त्व असलेले होते, सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान होते, त्यांच्या अंत्ययात्रेत समाजातील सर्वच थरातील मान्यवर तसेच तालुका संघातील विविध संघटना त्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, त्यांच्या अचानक जाण्याने समाजात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, सुन, नातू नात, दोन मुली, जावई, त्यांची मुले असा मोठा परिवार आहे.

दिवंगत तुकाराम विठू पवार यांचा पुण्यानुमोदन व शोकसभेचा कार्यक्रम रविवार दि. ८ जून २०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता मुक्काम गाव खोडदे, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथे मा. प्रजनशील पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे तरी विभागातील सर्व सभासद, कार्यकर्त्यांनी, विविध आंबेडकरी संघटना व त्यांच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून आदर्शांस श्रद्धांजली अर्पण करावी अशी विनंती बौद्धजन सहकारी संघ, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी, विभाग क्र. ६, शाखा क्र. ५१, मौजे खोडदे या शाखेच्या वतीने काढण्यात आलेल्या परिपत्रकात केली आहे.

## राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत ठाणे जिल्ह्यासाठी खेळून उदयन घोरपडे याने जिंकले सुवर्णपदक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी




कोल्हापूर येथे कुराश असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दि. २९ व ३० मे २०२४ रोजी पार पडलेल्या सब ज्युनिअर स्टेट कुराश चॅम्पियनशिप २०२४-२०२५ मध्ये ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत उदयन अजित घोरपडे याने पहिल्यांदाच सहभागी होत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या यशाबद्दल उदयन घोरपडे व त्यांचे प्रशिक्षक मुंबई विभाग प्रमुख व कोच आकाश जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

उदयन हा अत्यंत जिद्दी आणि चिकाटीने खेळणारा खेळाडू आहे. तो मत्त्यापूर तालुका सातारा या गावचा रहिवासी असून कराड उत्तरचे आमदार मनोज दादा घोरपडे यांचा तो पुतण्या आहे व उदयन घोरपडे चे वडील अजित घोरपडे हे सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार श्रीमंत शिवेंद्रराजे भोसले यांचे स्वीय सहाय्यक आहेत.उदयन ला कुराशबाबत फारशी माहिती नव्हती आणि सध्या तो गावी असल्यामुळे सरावाचीही संधी मिळाली नव्हती. तरी देखील त्याने जिद्द चिकाटी व मार्गदर्शन च्या जोरावर सुवर्णपदक मिळवले. ठाणे जिल्ह्याच्या इतर खेळाडूंनीही केलेली उज्वल कामगिरी केली त्यात. राजवीर देशमुख - सुवर्णपदक, आयुषी केंद्रे - रौप्यपदक

स्वरा गायकवाड - रौप्यपदक , या सर्व खेळाडूंनी ठाणे जिल्ह्याचा नावलौकिक राज्यस्तरावर वाढवला आहे, या यशाबद्दल कुराश असोसिएशन महाराष्ट्र चे अध्यक्ष अंकुश नागर व महासचिव शिवाजी साळुंखे त्याचबरोबर कराड उत्तरचे आमदार मनोज दादा घोरपडे यांनी सर्व खेळाडूंना आणि प्रशिक्षकांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## अल्ताफ दादासाहेब शेख दिग्दर्शित कर्मयोगी आबासाहेब आता सातासमुद्रापार कान्समध्ये!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : अत्यंत अभिमानास्पद बातमी! देशविदेशातील प्रतिष्ठित पुरस्कारांची शतपटीने छाप उमटवणारा आपला मराठी चित्रपट कर्मयोगी आबासाहेब आता जगप्रसिद्ध कान्स फिल्म फेस्टिव्हलच्या चरीलह.र्वी ऋळश्रा (मर्शे दु फिल्म) मार्केटमध्ये आपल्या उपस्थितीची नोंद करत आहे.

यावेळी हिंदी आणि मराठी बरेचसे चित्रपटांचे स्क्रीनिंग झालं दिनांक १३ मे ते दिनांक २४ मे यादरम्यान हिंदी आणि मराठी चित्रपटाचे स्क्रीनिंग झालं त्यामध्ये दिनांक १४ मे भारतीय वेळेनुसार दुपारी तीन वाजता कर्मयोगी आबासाहेब हा चित्रपट प्रेक्षकांमध्ये दाखवण्यात आला होता. देश विदेशातील दिग्गज कलाकार दिग्दर्शक निर्माता आणि मान्यवर उपस्थित होते हा गौरव केवळ महाराष्ट्राचाच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी अभिमानास्पद आहे. कर्मयोगी आबासाहेब याआधीच ३० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित झाला असून, आता त्याची दखल जागतिक स्तरावर घेतली जात आहे. या गौरवामुळे संपूर्ण टीम स्वतःला भाग्यवान व प्रेरित मानत आहे.

मायाक्का माऊली फिल्म प्रोडक्शन, मुंबई क्रिएशन इंटरटेनमेंट, रिलायन्स एंटरटेनमेंट, निर्माते बाळासाहेब महादेव एरंडे व मारुती तुळशीराम बनकर यांच्या निर्मितीत तयार झालेल्या या चित्रपटात प्रसिद्ध कलाकारांसह नवोदित कलावंतांनी देखील अत्यंत परिणामकारक अभिनय सादर केला आहे.

अनिकेत विश्वासराव, हार्दिक जोशी, विजय पाटकर, प्रदीप वेलणकर, देविका दफ्तरदार, पृथ्वीक प्रताप, अरबाज शेख, वृंदा बाळ, अली शेख, अमजदखान शेख,सफर शेख ,सुरेश विश्वकर्मा, महादेव शिरोळकर यांची प्रमुख भूमिका आणि प्रभावी अभिनय प्रेक्षकांच्या मनात ठसा उमटवतात.

चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक अल्ताफ शेख यांनी आपल्या लेखणीच्या ताकदीने आणि सादरीकरणाच्या शैलीने आबासाहेब यांचा जीवनप्रवास अगदी जिवंत आणि अंतःकरणाला भिडणारा उभा केला आहे. चित्रपटाच्या कान्समधील निवडीबद्दल टीमने आनंद व्यक्त करत, आमच्या कलाकृतीचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, अशी प्रतिक्रिया दिली आहे.




या आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रवासात, कान्स फेस्टिव्हल मार्केट कोऑर्डिनेटर ब्रिजेश गुरणानी यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले, याचीही संपूर्ण टीमने नमूद केली आहे.

कर्मयोगी आबासाहेब याची ही जागतिक झेप मराठी चित्रसृष्टीसाठी एक नवे दालन उघडणारी ठरणार आहे, यात शंका नाही!

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती महोत्सव

प्रा. केसर जाधव यांचे प्रतिपादन

# आरक्षणामुळे बौद्धांची प्रगती झाली नसून त्यांनी विज्ञानवादी दृष्टी स्वीकारल्याने झाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गुहागर दि. २२ (रामदास धो. गमरे) जगात प्रथम निसर्गाची निर्मिती झाल्यानंतर मानव उदयाला आला तो जस जसा विकसित होत गेला तस तसे अटी, नियम, कार्यप्रणाली, राहणीमान याची बंधन आली व त्यातूनच धर्माची संकल्पना पुढे आली या धर्मावर लगाम व दबाव ठेवण्यासाठी देवाची संकल्पना आली यातुनच इसवी सन पाचव्या शतकानंतर मूर्तिपूजा सुरू झाली व भिक्षुकी व आचार्यपद्धती पुढे आली त्यातून ब्राम्हणलिखित ग्रंथ, पुराणे, वेद, स्मृती निर्माण झाल्या आणि माणूस गुलाम होत गेला या गुलामीच्या जोखडातून मानवाला मुक्त करण्यासाठी म्हणून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटच्या क्षणापर्यंत रक्ताच पाणी करून गुलामीच्या बंधनाविरुद्ध बंड पुकारून चळवळ उभी केली आणि तळागाळातील मागास, वंचित, उपेक्षित वर्गाला ब्राम्हणवादी भाकडकथा, पुराणे, स्मृती नाकारून २२ प्रतिज्ञांचे पालन करा एकवेळ उपाशी रहा पण मुलांना शिकवा हा विज्ञानवादी संदेश दिला व तो बहुजन समाजाने स्वीकारला म्हणूनच बौद्धांची प्रगती झाली, नुसत्या आरक्षणाने नाही असे प्रतिपादन डॉ. केसर रामचंद्र जाधव यांनी वडद गावी प्रमुख वक्ता या नात्याने बोलत असताना केले.



बौद्धजन सहकारी संघ, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी गिमवी विभाग क्र. ३ गाव व मुंबई व वडद शाखा क्र. २८ यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती महोत्सव मौजे वडद येथे विभागीय अध्यक्ष राजेश रामचंद्र मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुंबई विभाग अध्यक्ष शशिकांत सुर्वे यांनी केले तर सूत्रसंचालन निलेश गमरे व राकेश मोहिते यांनी आपल्या गोड व लाघवी भाषाशैलीत करून सर्वांना मंत्रमुग्ध केले, तर पाहुण्यांचे स्वागत अनिल मोहिते, सुभाष पवार यांनी केले, सदर कार्यक्रमाच्या निमित्त बौद्धजन सहकारी संघ तालुका अध्यक्ष सुरेश सावंत, माजी चेअरमन रवींद्र मोहिते गुरुजी, माजी अध्यक्ष सुनील जाधव, माजी चिटणीस महेंद्र मोहिते, विश्वस्त श्रीपत गमरे, माजी विश्वस्त राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, दिलीप मोहिते, सचिन मोहिते, संदेश जाधव, सरपंचा अमिषा अजित गमरे (मुंढर), सरपंचा कोमल मुरमुरे (वडद), माजी सरपंच रमेश गोवड (वडद), भालचंद्र जोगळे (अध्यक्ष - विकास आघाडी), सोमनाथ गावंग (उपाध्यक्ष - विकास आघाडी), विशाल गमरे, वसंत शिगवण, रामचंद्र मुरमुरे, विभाग अधिकारी मनोज गमरे, विनिता सुर्वे, आरती मोहिते, सुधीर कदम, दीपक कदम, सचिन मोहिते, वसंत कदम, प्रविण कदम, वनिता पवार, संदीप धनावडे, प्रगती केरवकर, कल्याणी करंदीकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे लकी ड्रा ची पारदर्शक पध्दतीने सोडत झाली अध्यक्ष अनिल जाधव, चिटणीस प्रविण जाधव आणि त्यांच्या कमिटीने मोठं योगदान दिले तर खेळ खेळूया पैठणीचा मान राखूया वहिणींचा हा रवींद्र पवार संचालित होम मिनिस्टर या कार्यक्रमात प्रथम क्रमांक सौ. स्मिता महेंद्र मोहिते (कौंढर), सौ. ज्योती दीपक कदम (वडद), सौ. नीता विशाल जाधव (मुंढर), सौ. सचिता सचिन गमरे (चिखली) यांनी मान पटकावला. सदर जयंती महोत्सवानिमित्त फटाक्यांच्या आतिषबाजीत वडद गाव सीमा ते बौद्धविहार अशी भव्यदिव्य मिरवणूक मोठ्या दिमाखात वाजतगाजत डोंगरदऱ्यातून काढण्यात आली.

सदर कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवीधर, पदविकाधर गुणवंत विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या शुभहस्ते सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले तसेच मुलांचा सांभाळ करून वयाच्या पत्तीशीत बारावी उत्तीर्ण महिला, अंगणवाडी सेविका तसेच जिल्हा व तालुका पातळीवर क्रिकेट, थाळीफेक, रायफल शूटिंग अश्या विविध खेळात प्राविण्य मिळवणाऱ्या मुलांना ही पाहुण्यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. तद्नंतर कार्यक्रमास रंग भरण्यासाठी जंगी कव्वालींचा सामना आयोजित करण्यात आला, सरतेशेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेश रामचंद्र मोहिते यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या गाव व मुंबई विभागाच्या शाखा, कार्यकारिणी मंडळ, आजी-माजी विश्वस्त, तालुक्याचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, सभासद, महिला मंडळ, वडद शाखा या सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये अत्याधुनिक अग्निशमन वाहने उपलब्ध करून देणार : पालकमंत्री जयकुमार गोरे

## एमआयडीसी मधील कारखानदारांनी अग्निरोधक यंत्रणा सक्षम ठेवावी तसेच कोणत्याही प्रकारची अनाधिकृत बांधकामे करू नयेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) :राज्य शासन व प्रशासन हे कारखानदार, कामगार तसेच उद्योगाच्या विकासासाठी नेहमीच सहकार्याच्या भूमिकेत आहे. अक्कलकोट रोड एम आयडीसी मध्ये नुकतीच झा- लेली दुर्घटना पुन्हा होऊ नये यासाठी एमआयडीसीमध्ये रस्ते, पाणी, वीज या सुविधा बरोबरच अत्याधुनिक अग्निशामक वाह- ने लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील, अशी माहिती ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

सोलापूर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित अक्कलकोट एमआयडीसी मध्ये नुकत्याच घडलेल्या दुर्घटने संदर्भात आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक नगर रचना संचालक मनीष भिष्णूरकर, कार्यकारी अभियंता तपन डंके, स्मार्ट सिटी चे तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे, चखऊ विभागीय अधिकारी शिवाजी राठोड, अग्निशमन अधिकारी दिनेश अंभोरे, महापालिकेचे अग्निशाम क अधिकारी राकेश साळुंखे, श्रीमती रोहिणी तडवळकर, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, पेंटप्पा गडडम अध्यक्ष सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघ अध्यक्ष पॅन्टपा गड्डम, मल्लिकार्जुन कम टम, अंबादास बिंगी, नारायण आडकी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, एमआयडीसी मध्ये रस्ते लहान असल्याचे निर्देशनास आलेले आहे, त्यावर काही ठिकाणी अतिक्रमने झालेले असून ती अतिक्रमणे काढून टाकणं, रस्ते रुंदीकरण करणे तसेच या ठिकाणी पाच लाख लिटर पाणी साठवण क्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. महापालिकेला अत्याधुनिक अग्निशमन वाहने घेण्यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करण्यात येईल. शासन व प्रशासन उद्योग वाढीबरोबरच उद्योग व तेथे काम करणारे कामगाराच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रयत्न करतच आहे परंतु या भागातील कारखानदारांनी ही



तेवढे सहकार्य देणे आवश्यक असून नियमानुसार सर्व सुविधा कारखान्यात उपलब्ध ठेवणे ही आवश्यक असल्याचे त्यांनी सुचित केले.

> ■ सोलापूर महापालिका येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये सेंट्रल टेक्सटाईल कारखान्याला लागलेल्या आगीच्या तसेच त्यात झालेल्या मृत्यूच्या अनुषंगाने आढावा घेतला
>
> ■ सर्व संबंधित विभागानी पुढील आठ दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश

तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास म हामंडळ, महापालिका, अग्निशमन दल, पो- लीस विभाग तसेच संबंधित सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी या दुर्घटनेच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल पुढील आठ दिवसात द्यावा. हा वॉल प्राप्त झाल्यानंतर दुर्घटनेचे कारणे समोर येतील तसेच आग विझवताना आलेल्या अडचणी तसेच वॉटर फीडिंग ची व्यवस्था व अशा दुर्घटना पुन्हा होऊ नयेत या दृष्टीने पुढील काळात काटेकोरपणे नियोजन करणे शक्य होणार असल्याची माहिती पालकमंत्री श्रीगोरे यांनी दिली.

बांधकाम विभाग आणि अग्निशमन दलांना या घटनेसंदर्भात कोणाला नोटीस दिल्या आहेत, याची विचारणा करण्यात आली. कारखान्यांमध्ये अनधिकृत बांधकामे, कायद्याचे उल्लंघन, खबरदारीच्या उपायांचा अभाव आणि आवश्यक साहित्याची अनुपलब्धता यावर पालकमंत्री गोरे यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. तसेच कारखान्यांमध्येच प्रार्थना स्थळे असणे आणि काम गारांना तिथेच राहण्याची सोय करणे या बाबी नियमांना धरून नाहीत तरी कारखानदारांनीही नियमावलीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

एमआयडीसीमध्ये मुबलक पाण्याची सोय नसल्याने विविध समस्या भेडसावत असल्याचे उद्योग असोसिएशनने निदर्शनास आणले. एमआयडीसी मधील विविध सोयी सुविधा तसेच म ुबलक पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री म होदय तसेच उद्योग मंत्री महोदय यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल, असे श्री. गोरे यांनी सांगितले.

शहरात होणाऱ्या उड्डाणपुलावरती नागरिकांच्या आणि व्यापाऱ्यांच्या प्रतिक्रिया जाणून त्यावर लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. शासनाकडून ज्यांना जागा नाही, घर नाही अशा लोकांचाही सर्व्हे केला जाईल व त्यांना शासकीय जमिनीवरती घरेही लवकरच मि ळवून देण्याचा शासनाचा ध्यास असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांनी नुकत्याच एम आय डी सी मध्ये घडलेल्या दुर्घटनेचे अनुषंगाने पालकमंत्री महोदय यांना माहिती दिली.

**महापालिकेचा सर्वेक्षण अहवाल –**

महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी सादर केलेल्या अहवालात अग्निशमन दलाला आग विझवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागल्याचे नमूद केले. अनधिकृत बांधकामांमुळे अग्निशमन दलाच्या गाड्यांना घटनास्थळी पोहोचणे आणि प्रभावीपणे कार्य करणे अशक्य झाले. महानगरपालिकेच्या ९ सदस्यीय पथकाने केलेल्या सर्वे क्षणानुसार, प्रत्येक पथकात अग्निशमन विभाग, नगर रचना विभाग व कर विभागाचे अधिकारी सहभाग एकूण ९३२ मालमत्ताची पाहणी ५७ ठिकाणी अनधिकृत बांधकामे निदर्शनास आली ७३७ मालमत्तांमध्ये सामासिक अंतरामध्ये बांधकाम, गोडाऊन, शेड, बोईलर म शीनसाठी वापर असल्याचे दिसून आले.२१५ ठिकाणी रहिवास व औद्योगिक वापर होत असल्याचे दिसून आले.४५८ इमारतींमध्ये कोणत्याही प्रकारची अग्निशमन व्यवस्था उभारली गेली नसल्याचे निदर्शनास आलेकेवळ २७ इमारतीमध्ये अग्निशमन व्यवस्था..४४७ ठिकाणी अर्धवट किंवा केवळ दिसण्या पूर्ती अग्निशमन व्यवस्था..६७ ठिकाणी लोक अनधिकृतपणे निवासी वापर करत असल्याचे दिसून आले.असल्याचेही या अहवालातून समोर आले आहे.

## अनिताताई खरात यांनी मानले इंदापूर तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, ग्रामसेवक यांचे आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे : तेजपृथ्वी ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा सामाजिक कार्यकर्त्या अनिताताई खरात यांनी आज इंदापूर तालुक्यातील ग्रामपंचायत सदस्य सरपंच ग्रामसेवक प्रतिष्ठित नागरिक यांचे आभार मानले कारण अनिताताई म्हणाल्या की गेल्या ७ मे पासून २२ मे पर्यंत मी पंधरा दिवस इंदापूर तालुक्यात जनजागर यात्रा काढली व या जनजागर यात्रेच्या माध्यमातून त्यांनी इंदापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतला निवेदन दिलं की २०२३ रोजी जो शासनाच्या महिला व बालविकास विभागाने जीआर काढून ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रत्येकी दोन महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सन्मान गौरव पुरस्कार देण्यात यावा या पुरस्काराचे वितरण २०२४ रोजी झाली नाही ते आपण २०२३ प्रम ाणे पूर्ववत करून आपल्या गावातील दोन महिलांना किंवा त्यापेक्षा जास्त महिलांना आपण आपल्या ग्रामपंचायत मार्फत पुरस्कार वितरण करावा आणि आज अनिताताई म्हणाल्या की मला इंदापूर तालुक्यातून खूप ग्रामपंचायत क्षेत्रातून महिलांचे कार्यकर्त्यांचे फोन



आले फोटो आले की ताई आम्हाला आपण केलेल्या पंधरा दिवसाच्या परिश्रमामुळे जनजागर यात्रेमुळे आम्हाला आमच्या गावात पुरस्कार मि ळाला, खूप समाधान वाटते की एखाद्या बहिणीला तिच्या कार्याची पावती मिळते याचा आनंद खूप असतो आणि म्हणूनच मी सर्व ग्रामपंचायतचे मनःपूर्वक आभार म ानते.

तसेच एखाद्या ग्रामपंचायत ने काही कारणास्तव आज चुकून किंवा काही अडचणीमुळे पुरस्कार देण्याचे राहिले असेल तर तोही त्यांनी पुढील चार-पाच दिवसात द्यावा ही त्या ग्रामपंचायत मधील ग्रामसेवक सरपंच सदस्य यांना विनंती.

## दापेगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/अमर जाधव : औसा तालुक्यातील दापेगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात अहिल्यादेवी होळकर यांची ३००वी जयंती मोठ्या उत्स- ाहात साजरी करण्यात आली ,

दापेगाव येथे औसा तहसिलचे तहसिलदार घनशाम अडसुळ यांच्या प्रमुख उपस्थीतीत तहसिलदारांच्या शुभहस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेच पुजन करुन ध्वज- ारोहन करत मोठ्या उत्साहात जयंती साजरी करन्यात आली ,

दापेगाव जयंती समितीच्या वतिने दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा तहसिलदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला ,व मंत्रालयात नविनच दापेगावचे सुपुत्र गणपती हेजेराव यांची मंत्रालयात लिपीक मनुन नियुक्ती झाल्याने यांचाही तहसिलदार साहेबांच्या हस्ते सत्कार करण्यात आला ,यावेळी

तहसिलदार घनशाम अडसुळ , पशुसंवर्धन अधिकारी जाधव, वामन घोडके, तलाठी दुधभाते, मा.सरपंच श्रीधर सोनटक्के, ग्रामसेवक शेंडगे मॅडम, सरपंच मारुती पांडुळे, उपसरपंच गणेश लिंबाळकर, तंटाम ुक्ती अध्यक्ष शिवाजी सोनटक्के, उपाध्यक्ष प्रकाश वाघे, सोसायटी चेअरमन साधु वाघे, गोविंद सोनटक्के, परमेश्वर सोनटक्के, फुलचंद लिंबाळकर, राजेंद्र बोरफळे, भरत पांडुळे, राम लिंबाळकर, नागेश पांडुळे, प्रविन सोनटक्के, राजु वाघे, भाउसाहेब पांडुळे, सुरज मगर सह दापेगाव ग्रामस्थ उपस्थीत होते,

**प्रशासनाचे दुर्लक्ष ? नागरिकांतून संताप**

# चिंचोली एमआयडीसी येथील आयएमसी सीएनजी पंपावर वाहनांच्या लांबच लांब रांगा !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापूर शहर परिसरामध्ये सीएनजी पंपावर नेहम ीच वाहनधारकांच्या रांगा असतात. सुरळीत आणि नियमितपणे सीएनजी गॅस मिळत नसल्यामुळे अशी अडचण निर्माण होत असल्याची ओरड असते. हायवे वरून जाणारे आणि सोलाप- ुरातील स्थानिक वाहने एमआयडीसी चिंचोली येथील आयएमसी सीएनजी पंपावर गॅस भरण्यासाठी येत असतात. मात्र येथील कंपनी प्रशासनाने फिटेड आणि कंपनी अनफिटेड गाड्या एकाच रांगेतून सोडण्याचा स्वतःच्या मर्जीने निर्णय घेतल्यामुळे रस्त्यावर वाहनांच्या रांगांच्या रांगा लागत आहेत. यामुळे येथून जाणाऱ्या वाहनांचा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



संग्रहित छायाचित्र

आज शनिवारी भर दुपारी सुद्धा अनेक वाहने सीएनजी गॅस भरण्यासाठी रांगेत उभी होती.यामध्ये कंपनी फिटेड आणि कंपनी अनफिटेड सीएनजी वाहनधारकांमध्ये रांगे मधून येण्यामुळे मनस्ताप होत होता. याला कारण म्हणजे दोन्ही प्रकारच्या वाहनांसाठी एकच रांग असल्याचे वाहनधारकांचे म्हणणे होते.

फक्त कॅश पेमेंट स्वीकारले जाईल..!

केंद्र आणि राज्य सरकारने डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून अधिकाधिक व्यवहार होण्यासाठी प्रयत्न केले आहेत. मात्र आय एम सी च्या सीएनजी पंपावर फक्त कॅश पेमेंट स्वीकारले जाईल असा एक साधा बोर्ड लावल्याने ऑनलाइन पेमेंट करणाऱ्या वाहनधारकांना मोठा मनस्ताप स्वीकारावा लागत आहे.

आय एम सी च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष घालून संबंधितांवर कारवाई करून येथील पंपाला शिस्त लावावी अशी मागणी वाहनधारकांमधून जोर धरत आहे.

येथील पंपाच्या प्रशासनाशी चर्चा केली असता त्यांनी कोणता नियम आम्हाला माहित नाही. असे बोलून उडवाडवीची उत्तरे दिली.

येथील इन्चार्ज विशाल चतुर यांच्याशी यासंदर्भात प्रतिक्रिया घेतली असता मॅनेजर शशी चौगुले हे सध्या परगावी असल्याने उपलब्ध नसल्याची माहिती मिळाली आहे.

महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

**✻ वैशिष्ट्ये ✻**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तरावरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

**✻ प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ✻**

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/ तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

✻ आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.
✻ प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
✻ प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल.
प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.
✻

**✻ महत्वाची सुचना ✻**

१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्प्यावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.
३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.
४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.
५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.
६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्वःताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.
७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.
८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.
९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.
१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

**✻ प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ✻**

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक्ष संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.